**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक-२८२४/२०११/सोलापूर**

राज्य माहिती आयोग,
खंडपीठ पुणे, नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवनासमोर, पुणे-४११००१

श्री.अनिस सय्यद अहमद पटेल : अपिलार्थी
मु.पो.काटेगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,बार्शी,
एस.टी.स्टँडजवळ, ता.बार्शी, जि.सोलापूर

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता :
(संवसु विभाग), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, बार्शी, एस.टी.स्टँडजवळ, ता.बार्शी, जि.सोलापूर

**(आदेश पारीत दिनांक २१.५.२०१४)**

| मूळ अर्जाचा दिनांक | प्रथम अपिलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा आदेशाचा दिनांक |
|---|---|---|
| ७.४.२०११ | ४.६.२०११ | २९.६.२०११ |

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील प्रकरणी दि.२९.१०.२०१३ रोजी सुनावणी झाली होती. परंतु तत्कालीन राज्य माहिती आयुक्त प्रकृती

अस्वास्थ्यामुळे वैद्यकिय रजेवर असल्याने सदर अपिलावर अंतिम आदेश पारित होऊ शकले - नाहीत.

सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या लेखी निवेदनात ' आमचे संस्थेने महावितरण कंपनीकडे मिटर रीडींगचे काम केलेले आहे. त्याचे सोबत जोडलेल्या पत्रानुसार ५ बिलांची रक्कम मिळणेबात माहिती अधिकार २००५ नुसार विचारणा करण्यात आली होती. आपली नोटीस प्राप्त झालेनंतर माझे मागणी बिलापैकी क्र.४ व ५ ची रक्कम रू.४०८०/- चेक नं.५३८००३ दि.२८.१०.२०१३ द्वारे मला प्राप्त झालेली आहे. उर्वरित ३ बिलांची रक्कम रूपये ५१४९१ देण्याची प्रक्रिया सुरू असून सदरची रक्कम येत्या १५ दिवसात देणेबाबत कार्यकारी अभियंता महावितरण वि.का.बार्शी यानी हमी दिलेली आहे. तदनुसार सदर अपिलाबाबत माझी कसलीही हरकत/तक्रार राहणार नाही.' असे म्हटले आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर व अपिलार्थी यांची प्रकरणात दाखल लेखी विनंती विचारात घेता सदर अपिलावर पुन्हा सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही. सबब अपीलार्थीनी आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील क्र.२८२४/२०११/सोलापूर निकाली काढण्यात येत आहे.

**(रवींद्र जाधव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ पुणे**